# आकाशवाणी नागपूर,
## प्रादेशिक वृत्त विभाग
## प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
## सोमवार, दिनांक ०१ जुलै २०२४
## ठळक बातम्या

1. **लोकसभेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा सुरु.**
2. **वर्तमान पावसाळी अधिवेशनात पेपर फुटी रोखण्यासाठी विधेयक आणणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं विधानसभेत आश्वासन.**
3. **नागपुरात दीक्षाभूमीवर सुरू असलेल्या बांधकामाला तत्काळ स्थगिती दिली जाईल,- देवेंद्र फडणवीस यांची घोषणा, भूमिगत पार्किंगच्या मुद्द्यावरून आंदोलक आक्रमक.**
4. **माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती आज सर्वत्र कृषी दिन म्हणून साजरी.**

*****

अभिभाषण धन्यवाद प्रस्तावावर चर्चा

लोकसभेत आज संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेत भाग घेताना भाजप खासदार अनुराग सिंह ठाकूर यांनी गेल्या दहा वर्षांत सरकारने विविध क्षेत्रात केलेल्या कामाचं कौतुक केलं. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने लोकांच्या कल्याणासाठी आणि अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी अनेक पावले उचलली आहेत. 25 कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात आलं असून सरकारनं 80 कोटी लोकांना पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत मोफत अन्नधान्य दिलं आहे. चर्चेत भाग घेताना, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी NEET परीक्षेतील कथित अनियमितता, अग्निवीर योजना, मणिपूरमधील अशांतता, नोटबंदी, वाढती महागाई, शेतकरी समस्या आदी मुद्दे उपस्थित केले. NEET परीक्षेची रचना गरीबांना मदत करण्यासाठी नव्हे तर श्रीमंतांच्या बाजूने करण्यात आली आहे, असा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी NEETपरीक्षेतील अनियमिततेच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी संपूर्ण दिवस देण्याची मागणी केली. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याचं सांगत किमान आधारभूत किंमतीचा मुद्दाही राहुल गांधी यांनी उपस्थित केला. दरम्यान, राहुल गांधींच्या काही मुद्द्यांवर पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनी आक्षेप

घेतला. याशिवाय भाजप खासदार बांसुरी स्वराज, तृणमूल कॉंग्रेसच्या महूआ मोइत्रा यांनी देखील चर्चेत सहभाग घेतला.

पेपर फुटी रोखण्यासाठी विधेयक

विधीमंडळाच्या सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात पेपर फुटी रोखण्यासाठी विधेयक आणणार असल्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिलं. राज्यातल्या पेपर फुटीच्या संदर्भात विविध सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना ते उत्तर देत होते. 'गट क' श्रेणीतल्या पदांची भरती MPSC मार्फत होणार आहे. यासंदर्भात मंत्रिमंडळ निर्णय झाला असल्याचंही त्यांनी सांगितलं. महायुती सरकारच्या काळात १ लाख पदांची भरती होत आहे. त्यातल्या ५६ हजाराहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्र दिली आहे. सुमारे २० हजार पदांच्या भरतीची सर्व प्रक्रिया झाली असून त्यांना लवकरच नियुक्ती पत्र दिली जातील, असंही फडणवीस म्हणाले. आणखी ३१ हजारांहून अधिक पदांची भरती सुरू असल्याचही त्यांनी सांगितलं. परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी निरीक्षक म्हणून नेमले जात आहेत. याशिवाय परीक्षा केंद्रावर काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे निवडणुकीप्रमाणे रॅण्डमायझेशन करणार असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. राज्यात सुमारे अडीच लाख पद रिक्त असल्याचा दावा माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी यावेळी केला. या सर्व पदांची भरती करावी अशी मागणी त्यांनी केली. विविध विभागातल्या सुमारे ६० टक्के जागांची भरती करण्याची मंजुरी वित्त विभागाने दिली आहे, त्यानुसार भरती प्रक्रिया राबवली जाईल, असं आश्वासन गृहमंत्र्यांनी दिलं.

विधानसभा/जुनी पेन्शन योजना

अनुदानित शाळांमधील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी शिक्षक संघटनांशी बोलून त्यात यशस्वी मार्ग काढण्यात आला आहे, आता केवळ जिल्हा परिषदेच्या शिक्षकांचा प्रस्ताव प्रलंबित आहे, त्यांच्याकडील परिपूर्ण माहिती आल्यावर पुढील तीन महिन्यात त्यावर निर्णय घेतला जाईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. १०० टक्के अनुदान असणाऱ्या शाळांनाच अनुदानित शाळा गृहीत धरून त्यांनाच जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला होता ज्याला शिक्षक संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे, त्याचा जो निर्णय येईल त्यानुसार कारवाई करू, असं पवार म्हणाले. एकूण पगाराच्या दहा टक्के रक्कम संबधित शिक्षक आणि चौदा टक्के रक्कम सरकारद्वारा अशी २४ टक्के एकत्रित रक्कम करून पेन्शन योजना लागू केली जाईल आणि या निर्णयानंतर २०३० साली त्यातील पहिली

तुकडी निवृत्त होईल तेव्हा ही योजना लागू केली जाईल असंही पवार यांनी स्पष्ट केलं.

विधानपरिषद

आज विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना सभागृहात बोलू न दिल्यामुळे विरोधकांनी वॉक आउट करत निषेध व्यक्त केला. भारतीय संघाने ट्वेंटी-२० विश्वचषक किताब जिंकल्यानंतर सभागृहातील सत्ताधारी पक्षाच्या सदस्याने भाजपचच्या क्रिकेट बोर्डातील सदस्यांचं अभिनंदन करणारा प्रस्ताव मांडला. त्यावर आक्षेप घेत अंबादास दानवे यांनी मैदानावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंच अभिनंदन केले पाहिजे, असा प्रस्ताव मांडला. मात्र त्यावर सभापतींनी बोलू दिले नाही असा आक्षेप घेत 'आज आम्ही वॉक आउट करत निषेध व्यक्त केल्याची' प्रतिक्रिया विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केली. दरम्यान, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरूंचा कार्यकाळ दोन वर्षांवरून तीन वर्षे करण्यासाठीचं महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ सुधारणा विधेयक विधानपरिषदेत मंजूर करण्यात आलं. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी हे विधेयक मांडलं.

भाजप उमेदवार जाहीर

महाराष्ट्रात आगामी होणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाकडून पाच उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली असून माजी मंत्री पंकजा मुंडे यांना उमदेवारी देण्यात आली आहे. मुंडे यांच्यासह डॉ. परिणय फुके, माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर, अमित गोरखे यांचा त्यात समावेश आहे.

शाळा पहिला दिवस

दोन महिन्यांच्या सुट्ट्यानंतर आजपासून नागपूर महानगरपालिका तसेच खाजगी शाळा सुरु झाल्या. नागपूर महानगर पालिकेच्या कपिलनगर इथं शाळेच्या पहिल्या दिनानिमित्य मनपाच्या शिक्षणाधिकारी साधना सयाम यांच्या हस्ते मुलांना पुष्प देऊन तसंच मुलांवर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आलं. त्यांना मिष्ठान्न देण्यात आलं. यावेळी दिप प्रज्वलन करून, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शाळेला सुरुवात झाली. शाळेच्या परिसरात शैक्षणिक प्रदर्शनी देखील लावण्यात आली. गोंदिया जिल्ह्याच्या गोरेगाव पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या आडकुटोला इथं जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचं पुष्गुच्छ देऊन स्वागत करण्यात आलं त्यांनतर बैलबंडी वरून प्रभात फेरी काढण्यात आली. तर विद्यार्थी शाळेत यावे यासाठी जनजागृती पर गीत सादर करण्यात आले. वाशिम जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थेसह खासगी संस्थेच्या एकूण १

हजार ३७९ शाळा आज सुरू झाल्या. सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठव्या वर्गात जवळपास १.६८ लाख विद्यार्थ्यांची संख्या आहे. तर भारतरत्न डॉ.भिमराव आंबेडकर प्राथमिक शाळा मनपा, चंद्रपूर इथं शाळेचा पहिला दिवस हा 'शाळा प्रवेशोत्सव दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून चंद्रपूर महानगरपालिकेचे अभियंता विजय बोरीकर उपस्थित होते. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी वर्धा पंचायत समिती अंतर्गत येणा-या बोरगाव मेघे गणेशनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देऊन पहिल्या वर्गात दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व मुलांना पुस्तके देऊन स्वागत केले आणि पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

दीक्षाभूमी भूमिगत पार्किंग

नागपूर सुधार प्रन्यासद्वारे दीक्षाभूमी विकास आराखड्यातील दीक्षाभूमी स्तूपाजवळ भूमिगत पार्किंगला विरोध दर्शविण्यासाठी विविध आंबेडकरी संघटनांनी आज दीक्षाभूमी इथ आंदोलन केलं. दीक्षाभूमीच्या मुख्य स्तूपाला तसेच ऐतिहासिक बोधीवृक्षाला या भूमिगत पार्किंगमुळे धोका निर्माण होऊ शकतो असा आंदोलकांचा आक्षेप आहे.त्यामुळे आंदोलकांनी आक्रमक होऊन दीक्षाभूमी स्थळावर सुरू असलेले बांधकाम तोडण्याचा प्रयत्न करून आपला विरोध व्यक्त केला.दीक्षाभूमीच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य आणि विविध संघटनामध्ये या भूमीगत पार्किंग वरून चर्चा सुरू होती, परंतु कोणताही तोडगा या चर्चेतून अद्याप निघालेला नाही. दरम्यान, नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ.रवींद्र सिंगल यांनी दीक्षाभूमीला भेट देऊन अनुयायांना शांततेच आवाहन केलं. तत्पश्चात, नागपुरात दीक्षाभूमीवर सुरू असलेल्या बांधकामाला तत्काळ स्थगिती दिली जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. दीक्षाभूमी सुधार आरखडा दीक्षाभूमी स्मारक समितीच्या सूचनेनुसार सरकारने तयार केला आहे. त्याला स्मारक समितीने मंजुरी दिल्यावर सरकारने निधी दिला होता असं त्यांनी सांगितलं. तरी या आरखड्यावर काही आक्षेप असतील तर त्यावर सर्वांशी पुन्हा चर्चा करून आराखड्यात आवश्यक सुधारणा करू, असं आश्वासन फडणवीस यांनी विधानसभेत दिलं.

वसंतराव नाईक जयंती/कृषी दिन

कृषी क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती आज राज्यभरात कृषी दिन म्हणून साजरी होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी ट्विट संदेशाच्या माध्यमातून वसंतराव नाईक यांना अभिवादन केलं. अजित पवार यांनी मंत्रालयात वसंतराव नाईक यांच्या

प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. हरितक्रांतीचे प्रणेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १ जुलै रोजी विदर्भातील एका प्रयोगशील शेतकऱ्याला किंवा संस्थेला प्रयोगशील शेतकरी पुरस्काराने सन्मानित केले जातं. वसंतराव नाईक फाउंडेशन आणि वनराई फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान केला जातो.आज राष्ट्रभाषा संकुलातील श्रीमंत बाबूराव धनवटे सभागृहात राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक, वनबलप्रमुख डॉ. शैलेश टेंभुर्णीकर यांच्या हस्ते, माजी आमदार निलय नाईक यांच्या उपस्थितीत व वनराई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात देखील आज कृषीदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोल्याचे माजी कुलगुरू डॉ.शरद निंबाळकर उपस्थित होते. याशिवाय नागपूर विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर महावितरण कार्यालय, तसंच विविध सरकारी कार्यालय इथं वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आलं.

राष्ट्रीय डॉक्टर दिन

आज राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त केंद्रिय सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालयाच्या अंतर्गत नागपूरच्या धंतोली इथल्या यशवंत स्टेडियम मधील कम्पोझिट रिजनल सेंटर फॉर स्किल डेव्हलपमेंट, रिहॅबिलिटेशन अँड एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन विथ डिसेबिलिटीज तर्फे दिव्यांग व्यक्तींसाठी आरोग्य तपासणी शिबिराचं आयोजन करण्यात आलं. दिव्यांग, त्यांचे पालक आणि काळजीवाहक तसेच राष्ट्रीय वयोश्री योजने मधील वयोवृद्ध लोकांनी सुद्धा या शिबिराचा लाभ तसेच डॉक्टरांकडून आरोग्य मूल्यांकन आणि विनामूल्य सल्ला घेतला. प्रफुल्ल शिंदे, संचालक, सीआरसी नागपूर यांनी डॉक्टरांचं स्वागत केलं.

हवामान

विदर्भात येत्या पाच जुलै पर्यंत सर्व जिल्ह्यांमध्ये सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून सतर्कतेचा यलो अलर्ट देखील जारी करण्यात आला आहे. दरम्यान, आज विदर्भातील सर्व जिल्ह्यांत बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आज सकाळपासून नागपुरात ढगाळ वातावरण असून, काल रात्री दमदार पावसाने हजेरी लावली. मागील दोन दिवस चांगला पाऊस होत असल्याने वातावरणातील उकाडा कमी झाला आहे आणि कमाल तापमानात देखील बरीच घट झाली आहे.

नवेगाव नागझिरा जंगल सफारी

पाऊसाला सुरुवात झाल्याने गोंदिया भंडारा जिल्यातील वन वैभव असलेल्या नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील जंगल सफारी तीन महिन्या करिता बंद करण्यात आली आहे. ज्या पर्यटकांनी 1 जुलै २०२४ नंतर ऑनलाइन बुकिंग केलेली आहे त्यांचे पैसे परत करण्याबाबत नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या व्यवस्थापनाकडून आदेश काढण्यात आले आहेत. पुढील आदेशापर्यंत जंगल सफारी पूर्ण पणे बंद ठेवण्यात येईल असं प्रकल्पाच्या व्यवस्थापनाकडून सांगण्यात आलं आहे.

*****